मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२१

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा पदभार डॉ. पी. जी. पाटील यांनी स्विकारला









**दि. २ मार्च, २०२१.** कृषि क्षेत्रासाठी अद्ययावत तंत्रज्ञान अत्यंत आवश्यक आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या नावलौकिकाप्रमाणे या विद्यापीठाला गतवैभव प्राप्त करून सर्वांच्या सहकार्याने महात्मा फुले कृषि विद्यापीठ हा ग्लोबल ब्रँड तयार करणार असल्याचे प्रतिपादन नवनियुक्त कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. पाटील स्वागत समारंभात सर्वांना उद्देशून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक ढवण होते. यावेळी व्यासपीठावर पंजाब राज्य शासनाचे कर विभागाचे आयुक्त श्री. निळकंठ आव्हाड तसेच विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव श्री. मोहन वाघ आणि माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. हरी मोरे उपस्थित होते.

नवनियुक्त कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी आपल्या भाषणात पुढील पाच वर्षात विद्यापीठाने करावयाचा कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्याचा आराखडा मांडला. डॉ. पाटील पुढे म्हणाले की शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या कौशल्याधारित शिक्षणावर भर देणार आहे तसेच कृषी क्षेत्रातील विद्यार्थी हा कृषि उद्योजक कसा बनेल त्यादृष्टीने प्रयत्न केले जातील. कृषि संशोधन हा विद्यापीठाचा कणा आहे. राज्य शासनाच्या विकेल ते पिकेल या धोरणानुसार संशोधनाची दिशा

वर्ष :१, अंक क्रं. : ३, मार्च २०२१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

ठरविण्यात येईल. नॅनो तंत्रज्ञानाद्वारे शेतकऱ्यांना खतावर लागणारा खर्च कमी करून पीक उत्पादन खर्चात बचत करण्यात येईल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीसाठी एकात्मिक शेती पद्धतीवर भर देण्यात येईल. तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म अतिशय उपयुक्त आहे. त्याद्वारे शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यावर भर राहील. जिल्हा व तालुका पातळीवर शेतकरी सन्मान कक्ष स्थापन करून शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींवर उपाय देण्याचा प्रयत्न राहील असे डॉ. पाटील म्हणाले.

कुलगुरु डॉ. अशोक ढवण आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यासाठी मूल्यवर्धन हा एक अत्यंत महत्त्वाचा उपाय आहे. कृषि यांत्रिकीकरणावरही भर देणे गरजेचे आहे. कृषि विद्यापीठासमोर अनेक आव्हाने आहेत. परंतु, नवनियुक्त कुलगुरू डॉ. पाटील हे सर्वांच्या सहकार्याने त्यावर निश्चितच मात करतील असे डॉ. ढवण म्हणाले. यावेळी डॉ. अशोक फरांदे, डॉ. शरद गडाख, डॉ. हरी मोरे आणि श्री. निळकंठ आव्हाड यांनी आपल्या भाषणातून डॉ. पाटील यांना शुभेच्छा दिल्या. शेवटी कुलसचिव श्री मोहन वाघ यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद सोळंके यांनी केले. कार्यक्रमाला नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, सर्व सहयोगी अधिष्ठाता, सिरकॉट, मुंबईचे शास्त्रज्ञ तसेच विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ आणि कर्मचारी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर योग्य ते अंतर ठेऊन उपस्थित होते.

## कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांची मा. राज्यपालांशी भेट





**दि. १५ मार्च २०२१.** महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी मुंबई येथे राजभवनात महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल माननीय श्री. भगत सिंह कोश्यारी यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी कृषि विद्यापीठाच्या शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्याबाबत चर्चा केली. या चर्चेदरम्यान कुलगुरु डॉ. पाटील यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ शेतकऱ्यांसाठी पुरवत असलेल्या कृषि निविष्ठांबाबत राज्यपालांचे मार्गदर्शन घेतले. डॉ. पाटील म्हणाले की विद्यापीठ निर्मित बियाणे, रोपे, कलमे, जैविक कीडनाशके तसेच इतर उत्पादनांच्या विक्रीसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दहा जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या विक्री केंद्राद्वारे या कृषि निविष्ठा अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न राहिल. यावेळी कुलगुरू डॉ. पाटील यांनी विद्यापीठाच्या सेंद्रिय शेती प्रकल्पाबद्दल राज्यपालांना अवगत केले. कुलगुरू डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकासाचा कार्यक्रम राबवून

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्र. : ३, मार्च २०२१

त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध होण्यासाठी विद्यापीठ प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. यावेळी विविध विषयांवर झालेल्या चर्चेदरम्यान राज्यपालांचे मार्गदर्शन घेणार असल्याचे कुलगुरू डॉ.पाटील यांनी सांगितले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी राज्यपाल महोदयांची भेट घेतली.

## कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांची मा. खासदार शरद पवारांशी भेट





**दि. १८ मार्च, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी नुकतीच बारामती येथे माजी केंद्रीय कृषिमंत्री व मा. खासदार श्री. शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्याबद्दल चर्चा केली. या चर्चेत त्यांनी कृषि क्षेत्रापुढील आव्हानांचा सामना करण्यासाठी कृषि विद्यापीठाच्या कोणत्या योजना असतील तसेच दृष्टी, आराखडा काय असेल याबाबत त्यांचे मार्गदर्शन घेतले. तसेच केंद्र शासनाकडील कृषि विद्यापीठाचे प्रश्न सोडविण्यासाठी श्री. शरद पवार यांनी कुलगुरू डॉ. पाटील यांना नवी दिल्लीत संबंधित केंद्रीय मंत्र्यांबरोबर बैठक आयोजन करण्याचे आश्वासन दिले. यावेळी कुलगुरू डॉ. पाटील यांनी कृषि महाविद्यालय, पुणे व कृषि महाविद्यालय, धुळे येथील जमीन हस्तांतरण आणि शासनाकडून मिळालेल्या मोबदला याबाबत चर्चा केली. त्याचबरोबर कृषि विद्यापीठांमधील रिक्त पदे, संशोधनासाठी निधी याबाबतही खासदार श्री. शरद पवार यांचे लक्ष वेधले.

कुलगुरू डॉ. पाटील यांनी कृषि विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. राजेंद्र पवार यांची भेट घेऊन बारामती कृषि महाविद्यालयाला भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांची अधिस्वीकृती मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. यावेळी झालेल्या चर्चमध्ये इंक्युबेशन सेंटर स्थापनेसंबंधी तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर सामंजस्य करार करून शास्त्रज्ञांचा आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रमांमधील सहभाग वाढविण्यात येईल असे कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील मळद येथील शेतकरी उत्पादक कंपनीच्या १३० एकर डाळिंब शेतीला भेट देऊन कृषिभूषण अंकुश पडवळे यांचे कौतुक करुन शेतावरच त्यांचा व त्यांच्या टीमचा सत्कार करुन त्यांच्या पुढील वाटचालीला शुभेच्छा दिल्या.

मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ३, मार्च २०२१

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा सोयाबीन वाण राष्ट्रीय स्तरावर प्रसारित







**दि. १२–१३ मार्च, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, कसबे डिग्रज, जि. सांगली येथे विकसित केलेले केडीएस–९९२ हे सोयाबीन पिकाचे वाण राष्ट्रीय पातळीवर प्रसारित करण्यात आले आहे. दक्षिण भारतातील महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा व आंध्रप्रदेश या पाच राज्यांत या वाणाच्या लागवडीसाठी शिफारस करण्यात आली आहे.

केंद्रीय सोयाबीन वाण ओळख व प्रसार समितीची बैठक दि. १२ मार्च, २०२१ रोजी इंदोर येथे पार पडली असून देशाच्या विविध प्रातांसाठी एकुण आठ वाण प्रसारित करण्यात आले. यामध्ये प्रसारित झालेल्या आठ वाणांपैकी केडीएस–९९२ हा सर्वाधिक उत्पादन देणारा वाण ठरला असून त्याची उत्पादकता ६ क्विंटल अधिक आहे. याशिवाय, हा वाण दक्षिण भारतात पाने खाणाऱ्या अळीसाठी काही प्रमाणात सहनशील तर तांबेरा रोगास कसबे डिग्रज येथे मध्यम प्रतिकारक्षम सिध्द झाला आहे. याचे दाने मोठ्या आकाराचे असून १०० ते १०५ दिवसात हा वाण पक्व होतो. सोयाबीन पैदासकार डॉ. मिलिंद देशमुख यांनी हा वाण विकसित केला आहे.

अखिल भारतीय समन्वित सोयाबीन प्रकल्पांतर्गत दि. १२ व १३ मार्च रोजी पार पडलेल्या केंद्रिय सोयाबीन वाण ओळख समितीच्या बैठकीत अध्यक्षपदी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक डॉ. टी. आर. शर्मा तर सोयाबीन अनुसंधान संस्था, इंदोरच्या संचालक डॉ. नीता खांडेकर, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे सहाय्यक संचालक डॉ. संजीव गुप्ता व इतर मान्यवर सदस्य यावेळी उपस्थित होते. कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील, संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख आणि अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे यांनी कसबे डिग्रज कृषि संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. दिलीप कटमाळे, सोयाबीन पैदासकार डॉ. मिलिंद देशमुख आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

## बाजरी संशोधन योजनेला बाजरीच्या मातृ वाणांच्या विकासाकरिता उल्लेखनीय कामगिरीचे प्रमाणपत्र

**दि. २२–२३ मार्च, २०२१.** बाजरीच्या अखिल भारतीय ५६ व्या वार्षिक कार्यशाळेत, प्रकल्प समन्वयक, अखिल भारतीय बाजरी संशोधन योजना, मंडोर, जोधपुर (राजस्थान) (ICAR-AICRP on pearlmillet) यांच्या तर्फे अखिल भारतीय समन्वयीत बाजरी संशोधन योजना, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, कृषी महाविद्यालय, धुळे यांना बाजरी पिकाचे मातृ वाण विकसीत करणे करिता उल्लेखनीय कामगिरीचे प्रमाणपत्र (Appreciation Certificate for “B” parent Development) देऊन गौरवण्यात आले.

मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२१

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात जागतिक जल दिन साजरा





**दि. २२ मार्च, २०२१.** पिकांना पाण्याची अधिकाधिक आवश्यकता असते. पिकांना सुक्ष्म सिंचनाचा वापर करुन कमी पाण्यात अधिक उत्पादन घेऊन पाण्याची बचत करता येते. विद्यापीठाने विकसीत केलेल्या काटेकोर पाणी व्यवस्थापनाकरीता विकसीत केलेल्या तंत्रज्ञानाचा वापर अधिकाधिक होऊन पिकांच्या सिंचनाची कार्यक्षमता वाढणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठातील हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राद्वारे जागतिक जल दिनानिमित्त आयोजीत ऑनलाईन कार्यक्रमात कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील मार्गदर्शन करत होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणुन उस्मानाबाद रांजनी येथील नॅचुरल शुगर आणि पुरक उद्योग कारखान्याचे संचालक कृषि भुषण श्री. पांडुरंग आव्हाड उपस्थित होते. तसेच जागतिक जल दिनानिमित्त प्रमुख वक्ते म्हणुन नेटाफिम इंडिया प्रा.लि.चे कृषि विद्या प्रमुख इंजि. अरुण देशमुख हे होते. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, आंतरविद्या जलसिंचन व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. एम.एस. माने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना श्री. पांडुरंग आव्हाड म्हणाले पाणी ही नैसर्गिक साधनसंपत्ती असुन तिचा काटेकोर वापर करणे अतिशय गरजेचे आहे. शेतीसाठी पुर्नप्रक्रिया पाण्याचा वापर करण्यात यावा. पाण्याचा प्रत्येक थेंबावर शेती करणे अतिशय गरजेचे असुन पिकाच्या उत्पादकते बरोबर पाण्याची उत्पादकता वाढवणे अतिशय गरजेचे आहे. यावेळी इंजि. अरुण देशमुख यांनी जागतिक जल दिनानिमित्त सुक्ष्मसिंचनाद्वारे खत व्यवस्थापन आणि डिजीटल शेतीच्या वापराने पाणी व्यवस्थापन या विषयी मार्गदर्शन केले. डॉ. एम.एस. माने यांनी सिंचन पार्क या विषयी प्रात्यक्षिक स्वरुपात माहिती दिली. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने काटेकोर पाणी व्यवस्थापनासाठी विकसीत केलेल्या तंत्रज्ञानाविषयी माहिती दिली.

याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे यांनी प्रमुख अतिथींचे स्वागत करुन ओळख करुन दिली. यावेळी डॉ. दिलीप पवार यांनी जागतिक जल दिन कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संशोधन सहयोगी डॉ. मंगल पाटील यांनी केले तर आभार प्रकल्प सहसमन्वयक डॉ. मुकुंद शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थी, कर्मचारी व प्राध्यापक वर्ग तसेच शेतकरी बंधु मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळच्या सत्रात कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या शुभहस्ते आंतरविद्या जलसिंचन व्यवस्थापन विभागाच्या प्रक्षेत्रावर सिंचन पार्कचे उद्घाटन झाले. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, विभाग प्रमुख डॉ. एम.एस. माने आणि शास्त्रज्ञ उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ३, मार्च २०२१

## विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान






**दि. १९ मार्च, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात फिनोलेक्स इंडस्ट्रीजल मुकुल माधव फौन्डेशनच्या वतीने देण्यात येणाऱ्या स्वर्गीय श्रीमती मोहीनी प्रल्हाद छाब्रिया शिष्यवृत्तीचे वितरण कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे हस्ते डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात पार पडले. शिष्यवृत्तीचे धनादेश निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वितरीत केल्यानंतर विद्यार्थी आणि प्राध्यापकांना अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले की शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांनी स्वातःला गरजेच्या वेळी मिळालेल्या मदतीची जाण पुढील आयुष्यभर ठेवून आपणास शक्य असेल त्या परीने समाजासाठी उत्तम कार्य करुन परत फेड करणे आवश्यक आहे. मुकुल माधव फौन्डेशन तर्फे महात्मा फुले कृषि विद्यापीठातील ३६ पदवी, २० पदव्युत्तर आणि ३ आचार्य पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या गरजु आणि होतकरु अशा शेतकऱ्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती दिली जाते. कुलगुरु यांनी फिनोलेक्स परिवाराचे या दातृत्वाबद्दल कौतुक केले आणि गरजु शेतकरी पुत्र/पुत्री मध्ये शिक्षणाची ज्योत पेटती ठेवण्यासाठी दिलेल्या मदतीसाठी आभार व्यक्त केले. त्यावेळी इतरही मोठमोठ्या व्यावसायिकांनी कृषि शिक्षणास अशाप्रकारे मदत केल्यास शेतीच्या समस्या सोडविण्यासाठी हातभार लागेल असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे आणि सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी सदर शिष्यवृत्ती सुरु करण्यामागची पार्श्वभुमी स्पष्ट केली. सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सचिन नलावडे यांनी आभार मानले व प्रा. सुनिल फुलसावंगे यांनी सूत्रसंचालन केले. कोरोनाच्या पार्श्वभुमीवर मोजक्या लोकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या कार्यक्रमात फिनोलेक्सतर्फे विभागीय व्यवस्थापक श्री. योगेश राऊत हे उपस्थित होते. त्यांनी मुकुल माधव फौन्डेशनच्या कामाचा आढावा सादर केला. यावेळी सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे आणि इतर विभाग प्रमुख तसेच प्राध्यापक, कर्मचारी आणि शिष्यवृत्ती प्राप्त झालेले विद्यार्थी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन २१ दिवसीय हवामान अद्ययावत सेंद्रिय शेती या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम संपन्न

**दि. १६ मार्च, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कास्ट–कासम या प्रकल्पाअंतर्गत हवामान अद्ययावत सेंद्रिय शेती या विषयावर आयोजित राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन २१ दिवसीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील उपस्थित होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी कुलगुरू

डॉ.राजाराम देशमख हे उपस्थित होते. या वेळी बोलताना डॉ. देशमुख यांनी सांगितले कि या अद्ययावत तंत्रज्ञान अभ्यासक्रमाचा उपयोग तरुण, शेतकरी वर्ग आणि शास्त्रज्ञांनी कार्यक्षमपणे करावा तसेच तरूण शेतकरी वर्ग यांनी स्वतःच्या शेतावर निविष्ठा तयार करण्यासाठी प्राधान्य द्यावे. त्यामुळे निविष्ठांवर होणाऱ्या खर्चात बचत होईल. पुढे बोलताना त्यांनी या प्रशिक्षणाचा उपयोग प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या शेतावर व संशोधनामध्ये होऊन एकात्मिक सेंद्रिय शेती संशोधन देशभर होणे हि काळाची गरज आहे असे मत त्यांनी मांडले.

ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम समारोपाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील होते त्यांनी एकवीस दिवसीय ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन केल्याबद्दल हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापन प्रकल्प आणि सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण प्रकल्पाचे विशेष कौतुक केले.

या राष्ट्रीय ऑनलाईन प्रशिक्षणात ८० प्रशिक्षणार्थिनी सहभाग नोंदला. यामध्ये देशातील शेतकरी, विद्यार्थी व शास्त्रज्ञ होते. या कार्यक्रमास उपस्थित डॉ. अशोक फरांदे, संचालक शिक्षण यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक तर संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी एकात्मिक सेंद्रिय शेती संशोधनाविषयी मत मांडले. कार्यक्रमाचे निमंत्रक डॉ. सुनील गोरंटीवार यांनी प्रकल्पाची माहिती दिली तर प्रमाणपत्र अभ्यासक्रम कार्यक्रमाचा आढावा प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे संचालक डॉ. उल्हास सुर्वे यांनी घेतला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. मुकुंद शिंदे यांनी केले. प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. सुनील थोरात, डॉ. रोहित सोनावणे, डॉ. निलम कोंडविलकर आणि इंजि. मोहसीन तांबोळी यांनी काम पाहिले.

## हवामान स्मार्ट कृषीसाठी मूलभूत भौगोलिक माहिती प्रणाली या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम संपन्न

**दि. १९ मार्च, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कास्ट–कासम या प्रकल्पाअंतर्गत हवामान स्मार्ट कृषिसाठी मूलभूत भौगोलिक माहितीप्रणाली या विषयावर आयोजित राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन २१ दिवसीय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा समारोप संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील उपस्थित होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील भूमाता चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक डॉ. बुधाजीराव मुळीक हे उपस्थित होते. या वेळी बोलताना डॉ. बुधाजीराव मुळीक यांनी सांगितले कि या भौगोलिक माहिती प्रणाली अभ्यासक्रमाचा उपयोग विद्यार्थी आणि शास्त्रज्ञांनी हवामान स्मार्ट शेतीसाठी, नैसर्गिक संसाधन, पाणी व्यवस्थापन आणि अचूक शेतीसाठी कार्यक्षमपणे वापर करावा. या प्रशिक्षणाचा उपयोग प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या शेतीसाठी व हवामान स्मार्ट शेतीसाठी आणि नैसर्गिक संसाधन संशोधनामध्ये उपयोग देशभर होणे हि काळाची गरज आहे असे मत त्यांनी मांडले.

ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम समारोपाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील उपस्थित होते. त्यांनी एकवीस दिवसीय ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन केल्याबद्दल हवामान अद्यावत शेती व जलव्स्थापन प्रकल्पाचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्लीचे आयसीएआर–एनएएचईपी, राष्ट्रीय समन्वयक डॉ. प्रभात कुमार उपस्थित होते. त्यांनी २१ दिवसीय ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन केल्याबद्दल हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापन प्रकल्पाचे विशेष कौतुक केले. या राष्ट्रीय ऑनलाईन प्रशिक्षणात ८५ प्रशिक्षणार्थिनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये देशातील विद्यार्थी व शास्त्रज्ञ उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे यांनी तर संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर हवामान स्मार्ट कृषिसाठी उपयोग करावा असे मत मांडले. कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला.

कार्यक्रमचे निमंत्रक डॉ. सुनील गोरंटीवार यांनी प्रकल्पाची माहिती दिली तर प्रमाणपत्र अभ्यासक्रम कार्यक्रमाचा आढावा प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे संचालक डॉ. भाऊ गावित यांनी घेतला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. मुकुंद शिंदे यांनी केले. प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. जे. राजेश, डॉ. चैतन्य पांडे आणि इंजि. मोहसीन तांबोळी यांनी काम पाहिले.

## कृषि विस्तार व संज्ञापन विभागाद्वारे महिला प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन





**दि. २५ मार्च, २०२१.** कृषि विस्तार व संज्ञापन विभाग, पदव्युत्तर महाविद्यालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीने आयोजित केलेल्या दोन दिवसीय, कृषि आधारीत उपजिविका उपक्रमांच्या माध्यमातून कोव्हिड–१९ पश्चात अनुसूचित जाती महिलांच्या स्थितीस्थापकत्वाचे बळकटीकरण या महिला प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. सदर प्रशिक्षणाच्या उद्घाटनास अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे हे अध्यक्ष म्हणुन लाभले होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पदव्युत्तर महाविद्यालय तथा निम्नस्तर (कृषि शिक्षण) सहयोगी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे हे होते. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे, विभाग प्रमुख, जीवरसायनशास्त्र विभागाचे डॉ. राजीव नाईक हे उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. अशोक फरांदे म्हणाले की भारत हा कृषि प्रधान देश ऐवजी महिला प्रधान देश व्हावा. तसेच ते पुढे म्हणाले प्रक्रिया उद्योगाबद्दल तपशीलावर या प्रशिक्षणात माहिती दिली जाणार आहे. आपल्या कृषि मालाचे मूल्यसंवर्धन करुन अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी त्याचा वापर करावा. पुढे ते म्हणाले की परसबागेतील भाजीपाला व कुक्कुटपालन या जोडधंद्याची जोड दिली तर ग्रामीण भागातील महिलांचे जीवनमान उंचविण्यास मदत होणार आहे. शेतीबरोबरच महिला उद्योजक निर्माण झाल्या पाहिजेत. महिलांनी कृषिच्या तंत्रज्ञानाचे धडे घेतले तर त्या बचत गटाच्या माध्यमातुन इतर महिलांना याबाबत अवगत करु शकतात.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना डॉ. श्रीमंत रणपिसे म्हणाले की फळप्रक्रिया उद्योगात खूप संधी उपलब्ध आहेत. आवळा प्रक्रिया करुन अनेक महिलांनी गृह उद्योग सुरु केले आहेत व आपल्या कुटुंबाला आर्थिक पाठबळ दिले आहे. प्रास्ताविक करताना डॉ. मिलिंद अहिरे यांनी प्रशिक्षणाचा उद्देश विषद केला. ते म्हणाले की महिलांनी विद्यापीठाने विकसीत केलेले तंत्रज्ञान आत्मसात करावे व प्रशिक्षणाद्वारे मिळालेले ज्ञान आपल्या रोजच्या वापरात आणावे. सदर प्रशिक्षणास २५ अनुसूचित जाती महिला उपस्थित होत्या. प्रशिक्षणास डॉ. विष्णू गरंडे, डॉ. योगेश कांदळकर, डॉ. भगवान देशमुख, डॉ. विक्रम कड, डॉ. प्रमोद साखरे व प्रा. सौ. धनश्री पाटील हे व्याख्याते म्हणून लाभले. कार्यक्रमाची रुपरेषा कृषि विस्तार व

संज्ञापन विभागाचे प्राध्यापक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी विषद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. पद्मकुमार पाटील यांनी केले. शेवटी डॉ. ज्ञानदेव फराटे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. मनोहर धादवड, श्री. राजुदास राठोड, श्री. विश्वनाथ पवार, श्री. विश्वनाथ तोंडे व श्री. अनिल येवले यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सॉफ्ट स्किल व पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट कौशल्य आधारीत प्रशिक्षण आयोजन



**दि. २५-२६ मार्च, २०२१.** कोव्हीड-१९ च्या परिस्थितीमुळे प्रत्येकाला ताणतणावाचा सामना करावा लागत आहे. या बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सॉफ्ट स्किल व पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट कौशल्य आधारीत प्रशिक्षण महत्वाचे आहे. केवळ ज्ञान महत्वाचे नसून ज्ञानाबरोबरच कौशल्य निर्मिती करणे आणि इतरांना हस्तांतरीत करणे ही महत्वाची प्रक्रिया आहे. डिजिटलायझेशनच्या पार्श्वभूमीवर कृषि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत परिणामकारकरीत्या पोहचविण्यासाठी सॉफ्ट स्किल व व्यक्तिमत्व विकास आधारीत प्रशिक्षण महत्वाचे आहे. विद्यार्थी, प्राध्यापक तसेच संस्थेच्या चांगल्या गुणवत्तेसाठी अशा प्रकारची प्रशिक्षणे महत्वाची असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे यांनी केले.

कृषि विस्तार व संज्ञापन विभाग, पदव्युत्तर महाविद्यालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीने आयोजीत केलेल्या दोन दिवसीय सॉफ्ट स्किल व पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरुन डॉ. फरांदे बोलत होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी विभाग प्रमुख डॉ. सुभाषचंद्र शिंदे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व कृषि विस्तार व संज्ञापन विभाग प्रमुख डॉ. मिलिंद अहिरे, कृषि विस्तार व संज्ञापन विभागाचे प्राध्यापक डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. मनोहर धादवड, पुणे कृषि महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक श्री. थॉमस, नाशिकचे सीईओ, लाईफ ॲण्ड बिझनेस कोच श्री. विक्रम काजळे, ठाणेचे लाईफ कोच ॲण्ड हिप्नॉटिस्ट श्री. सुशिल धनवडे आणि पुणेचे फ्लायऐजिस्ट एअर फोर्स स्कुल श्रीमती सुमिता चावरे उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे डॉ. सुभाषचंद्र शिंदे म्हणाले की कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण ही एक महत्वाची विस्तार पध्दत असून कृषि तंत्रज्ञानाच्या प्रचार प्रसारासाठी विस्तार कार्यकर्त्यांकडे सॉफ्ट स्किल असणे हे महत्वाचे आहे. कोव्हीड-१९ च्या काळात या प्रशिक्षणातून मिळवलेले ज्ञान व कौशल्य सहभागी प्रशिक्षणार्थींना कृषि विस्तार कार्यात व वैयक्तिक आयुष्यात खूप उपयोगी पडेल. मार्गदर्शन करतांना डॉ. मिलिंद अहिरे म्हणाले की कोव्हीड-१९ मुळे सध्यपरिस्थितीत अनेकांना

वैयक्तिक, पारिवारिक, कार्यालयीन पातळीवर ताण–तणावांचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर हे प्रशिक्षण सहभागी प्रशिक्षणार्थींना मानसिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी व सामाजिक संबंध सदृढ ठेवण्यासाठी उपयोगी ठरेल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. मनोहर धादवड यांनी दोन दिवसीय प्रशिक्षणाचे पुनर्विलोकन केले. या प्रशिक्षणात वक्तृत व सादरीकरण कौशल्य,भावनिक बुध्दिमत्ता व स्वयं व्यवस्थापन कौशल्य, वेळ व ताण–तणाव व्यवस्थापन, संघर्ष व्यवस्थापन व वाटाघाटी कौशल्य या विषयावर श्री. थॉमस, श्री. विक्रम काजळे, श्री. सुशिल धनवडे आणि श्रीमती सुमिता चावरे या तज्ञांकडून सहभागी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोहर धादवड यांनी तर आभार डॉ. गोरक्ष ससाणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. ज्ञानदेव फराटे, श्री. राजुदास राठोड, श्री. संतोष चौगुले, श्री. पद्‌मकुमार पाटील, श्री. विश्वनाथ पवार, श्री. विश्वनाथ तोंडे व श्री. अनिल येवले यांनी विशेष परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**दि. ३१ मार्च, २०२१.** कृषि विस्तार व संज्ञापन विभाग, पदव्युत्तर महाविद्यालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या वतीने अनुसूचित जाती विद्यार्थ्यांसाठी भारतीय कृषि संशोधन परिषदेमार्फत घेतल्या जाणाऱ्या जेआरएफ/एसआरएफ, आयसीएआर–नेट/एआरएस इत्यादी अखिल भारतीय स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी चार दिवसीय मार्गदर्शन वर्गांचे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी मुख्य अतिथी म्हणून, कृषि विज्ञान विद्यापीठ, बेंगलोर येथील माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. एम.एस.नटराजु बोलत होते. डॉ. नटराजु म्हणाले की या उपक्रमाच्या माध्यमातून अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्पर्धा परीक्षांमध्ये भरघोस यश मिळावे व त्यांचे उच्च शिक्षण व नोकरीच्या माध्यमातून जीवनमान उंचावावे यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने उचललेले हे एक खूपच चांगले पाऊल आहे. देशातील मोजकीच विद्यापीठे अशा प्रकारच्या उपक्रमांच्या आयोजनात पुढाकार घेताना दिसतात. विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन आणि प्लेसमेंट या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून मानव संसाधन विकास, कौशल्यविकास, ज्ञानवृद्धी तसेच नोकरी मिळवण्यासाठी विद्यापीठाचा हा उपक्रम मैलाचा दगड ठरेल. या प्रसंगी विद्यापीठाचे संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, पुण्यलोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगावचे सहयोगी अधिष्ठाता तथा कृषि विस्तार व संज्ञापन विभाग प्रमुख डॉ. मिलिंद अहिरे, सहसमन्वयक डॉ. जी.के. ससाणे, आयोजक सचिव डॉ.मनोहर धादवड, डॉ. भरत भालेराव, सह आयोजक डॉ. एम.आर पाटील, डॉ. प्रशांत पवार, डॉ. संजय सपकाळ उपस्थित होते.

यावेळी डॉ. गडाख म्हणाले की जेआरएफ, एसआरएफ परीक्षांमधील यश हे केवळ पुढील उच्चशिक्षणासाठीच्या प्रवेशासाठीच महत्त्वाचे नसून विद्यार्थ्यांना व त्यांच्या परिवाराला मासिक शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आर्थिक हातभार देखील आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी ते आवश्यक आहे. विद्यापीठाच्या रँकिंगच्या दृष्टीनेही जेआरएफ, एसआरएफ, नेट आणि एआरएस परीक्षांमधील विद्यार्थ्यांचे यश महत्त्वाचे आहे. यावेळी प्रमुख पाहुण्यांचा परिचय व स्वागत डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. कार्यक्रमाच्या आढाव्याचे सादरीकरण व सूत्रसंचालन डॉ. मनोहर धादवड यांनी केले तर आभार डॉ. जी.के. ससाणे यांनी मानले. कार्यक्रम समन्वयक म्हणून डॉ. डी.एन. फराटे, श्री. पद्मकुमार पाटील व श्री. संतोष चौगुले यांनी काम पाहिले.

मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२१

वर्ष :१, अंक क्रं. : ३, मार्च २०२१   महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महिलांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न






**दि. ३१ मार्च, २०२१.** कृषि विस्तार व संज्ञापन विभाग, पदव्युत्तर महाविद्यालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीने आयोजीत केलेल्या दोन दिवसीय कृषि आधारीत उपजिविका उपक्रमांच्या माध्यमातून कोविड–१९ पश्चात अनुसूचित जाती महिलांच्या स्थितीस्थापकत्वाचे बळकटीकरण या दोन दिवसीय महिला प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप नुकताच संपन्न झाला. सदर प्रशिक्षणाच्या समारोपास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय हळगावचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे अध्यक्ष म्हणुन लाभले होते. तसेच कृषि विस्तार व संज्ञापन विभागाचे प्राध्यापक डॉ. गोरक्ष ससाणे उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. मिलिंद अहिरे म्हणाले की प्रशिक्षणामध्ये घेतलेल्या ज्ञानाचा अवलंब करुन प्रक्रिया उद्योग सुरु करुन महिलांनी सबलीकरण करावे. अल्प शेतीवर प्रक्रिया उद्योग सुरु करुन देशापुढे आपले उदाहरण ठेवावे. प्रास्ताविक करताना डॉ. गोरक्ष ससाणे यांनी प्रशिक्षणाचे महत्व विषद केले. सदर प्रशिक्षणास २५ अनुसूचित जाती महिला उपस्थित होत्या. प्रशिक्षणास डॉ. विष्णू गरंडे, डॉ. योगेश कांदळकर, डॉ. भगवान देशमुख, डॉ. विक्रम कड, डॉ. प्रमोद साखरे व प्रा. सौ. धनश्री पाटील हे व्याख्याते म्हणून आपल्या विषयी प्रशिक्षणार्थींना माहिती दिली. या कार्यक्रमात उपस्थित प्रशिक्षणार्थी महिलांनी मान्यवरांच्या हस्ते कृषि निविष्ठा व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. पद्‌मकुमार पाटील यांनी केले. शेवटी डॉ. मनोहर धादवड यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. ज्ञानदेव फराटे, श्री. राजुदास राठोड, श्री. विश्वनाथ पवार, श्री. विश्वनाथ तोंडे व श्री. अनिल येवले यांनी विशेष परिश्रम घेतले.

वर्ष :१, अंक क्रं. : ३, मार्च २०२१    महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## भारतीय कृषि अनुसंधान परिषद शेतकरी प्रथम प्रकल्पातंर्गत विविध प्रात्यक्षिकांचे आयोजन









**मार्च, २०२१.** नवी दिल्लीच्या भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठाने सन २०२०–२१ च्या रब्बी हंगामामध्ये चिंचविहिरे आणि कणगर गावात विविध प्रात्यक्षिके घेतली आहेत. यामध्ये हरभऱ्याचा फुले विक्रम वाण, रब्बी ज्वारीच्या फुले वसुधा आणि फुले रेवती या वाणांचा समावेश आहे. याशिवाय भूमिहिन आणि लहान शेतकरी कुटुंबांना कावेरी व वनराज जातीच्या परसबागेतील कुक्कुटपालनासाठी एकूण ६००० पिल्ले देण्यात आली. सदर १०० कुटुंबातील महिला व पुरुषांना शास्त्रोक्त प्रशिक्षण देऊन याद्वारे त्यांचे जीवनमान उंचविण्याचा प्रयत्न आहे. याशिवाय या दोन्ही गावांतील २० शेततळ्यांमध्ये (रोहू, कटला जातीचे मासे) मत्स्यपालनाला चालना देण्यात येत आहे. या प्रकल्पाद्वारे दुग्धव्यावसायिकांना मूरघासासाठी प्रोत्साहन देण्यात येत असून गांडूळखत उत्पादनासाठी त्यांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आणि विस्तार शिक्षण व संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे व त्यांचे सहकारी प्रयत्नशील आहेत.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ३, मार्च २०२१

## महाराष्ट्र कृषि तंत्रज्ञ संस्थेच्या सचिवपदी डॉ. आनंद सोळंके यांची निवड



**दि. ९ मार्च, २०२१.** महाराष्ट्रातील कृषि क्षेत्राला दिशा देणारी मार्गदर्शन तसेच शासनास शेतकऱ्यांच्या हितासाठी सल्ला/शिफारशी देणारी राज्यस्तरीय महाराष्ट्र कृषि तंत्रज्ञ संस्थेच्या राज्यस्तरीय नियामक मंडळाच्या नवनिर्वाचित सदस्यांची सभा दि. ६/०३/२०२१ रोजी फलोद्यान महाविद्यालय, पुणे येथे संपन्न झाली. त्यामध्ये निवडुन आलेल्या सदस्यांमधून पुढील तीन वर्षांसाठी खालीलप्रमाणे कार्यकारी समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये कृषि क्षेत्रातील तज्ञ, विचारवंत, निवृत कुलगुरु यांचा सामावेश आहे. यामध्ये डॉ. वेंकटराव मायंदे, डॉ. राजाराम देशमुख, डॉ. उमाकांत दांगट, श्री. जयवंत महल्ले, डॉ. पराग हळदनकर, डॉ. रामकृष्ण मुळे, डॉ. सुदाम अडसुळ, डॉ. पुरुषोत्तम झंवर, डॉ. आनंद सोळंके, डॉ. उषा डोंगरवार, श्री. अतुल मारणे यांची निवड झालेली आहे. तसेच ११ सदस्यांची स्विकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली. या समितीवर महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कृषि विद्या विभाग प्रमुख व प्रमुख शास्त्रज्ञ, बियाणे डॉ. आनंद सोळंके यांची सचिवपदी निवड झालेली आहे. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## एप्रिल महिन्यातील कृषि सल्ला

### भुईमूग (उन्हाळी)

- भुईमूग पिकाच्या पानावरील टिक्का व तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास २५ ग्रॅम मॅन्कोझेब (डायथेन एन ४५) + १०ग्रॅम बाविस्टीन १० लिटर पाण्यातून फवारावे.

### बागायती कापूस

- कापूस लागवडीसाठी मध्यम ते भारी, ९० सें. मी. पेक्षा जास्त खोली असणारी व चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. जमिनीचा सामू ६ ते ८.५ पर्यंत असावा.
- जमिनीची खोल नांगरट करून जमीन उन्हाळ्यात तापू द्यावी.

### ऊस

- सुरु उसासाठी रासायनिक खताचा तिसरा हप्ता हेक्टरी २५ किलो नत्र (५५ किलो युरिया) देऊन बाळबांधणी करावी.

- ऊस पिकास ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे. शक्य असल्यास उसाच्या पाचटाच्या आच्छादनाचा वापर करा. पाणी कमी असल्यास उसाला एक सरी आड पाणी द्यावे.
- खोडकिड या किडीचा फार प्रादुर्भाव झाल्यास शेतात उगवण विरळ दिसते. अशावेळी एकरी रोपांची संख्या योग्य प्रमाण राखण्यासाठी लागणीबरोबर प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये अगर प्लॅस्टीक ट्रे मध्ये पुरेशी उसाची रोपे तयार करून योग्य वेळी नांग्या भरण्यासाठी (विरळ जागी) ही रोपे लावावीत.
- पाचटाचे सरीमध्ये आच्छादन (मल्चिंग) अवश्य करावे. त्यामुळे देखील खोडकिडीचा प्रादुर्भाव कमी होतो.
- उसाला एक ते दीड महिन्यानंतर बाळ बांधणी केल्यास खोडकिडीचे पतंग बाहेर पडल्याने तयार झालेली छिद्रे बंद होण्यास मदत होईल व पतंग बाहेर पडणार नाहीत.
- उसामध्ये मका, ज्वारी व गहू ही आंतरपिके न घेता कांदा, लसूण, कोथिंबीर,पालक ही आंतरपीके घ्यावीत.
- ऊस लागवडीनंतर ४० ते ५० दिवसांनी ३ ते ४ फुले ट्रायकोकार्ड/हेक्टर या प्रमाणात साधारणः १० ते १५ दिवसांच्या अंतराने लावावीत.
- खोडकिडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे (इ.एस.बी.ल्युर) शेतात लावावे. क्लोरॅनट्रॅनिलीप्रोल ०.४% दाणेदार १८.७५ किलो प्रति हेक्टरी अथवा फिप्रोनिल ०.३% दाणेदार हे किटकनाशक २५ ते ३० किलो प्रति हेक्टरी या प्रमाणात वापरावे.

### गहू

- धान्य कडक उन्हात वाळवून साठवणूक करावी. साठवणुकीच्या वेळी औषध वापरावे.

### खरीप नाचणी लागवड

- शेतीची नांगरट करणे
- कुळवणी करणे
- शेतातील धसकटे वेचणे

### फळबाग व्यवस्थापन

- **डाळिंब –** पाणी व्यवस्थापनाकडे लक्ष द्यावे. फळ पोखरणाऱ्या अळीचे नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी.तेल्या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी हंगामी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.
- **सिताफळ –** बहार धरलेल्या झाडासाठी पाणी व्यवस्थापन करावे. पिठ्या ढेकूण या किडीचे सर्वेक्षण करुन किड व्यवस्थापन करावे.
- **बोर –** बहार ताणावर सोडावी. कागदी लिंबू – उन्हाळ्यात ८–१० दिवसाचे अंतराने पाणी द्यावे. रोगट, किडग्रस्त व वाळलेल्या फांद्याची छाटणी करावी.

**काळीमाशी** : थायोमिथोक्झाम १ ते १.५ ग्रॅम / १० लि. पाण्यातून फवारावे.

**खवले कीड** : क्विनॉलफॉस ३० मिली / १० लि. पाण्यातून फवारावे.

**शेंडेमर** : कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम/ १० लि. पाण्यातून फवारावे.

मोसंबी व लिंबू बागेमध्ये फांदीमर रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझीम १ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड ३ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून एप्रिल महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवडयात फवारणी करावी.

वर्ष :१, अंक क्रं. : ३, मार्च २०२१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

वर्ष :१, अंक क्रं. : ३, मार्च २०२१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

### भाजीपाला व्यवस्थापन

- रबी कांद्याचे पीक काढणी अवस्थेत असल्यास तीन आठवडे आधी पिकांचे पाणी तोडावे. त्याचप्रमाणे बुरशीनाशकाचा फवारा द्यावा.
- लसूण पीक काढणी अवस्थेत असल्यास तीन आठवडे आधी पाणी तोडावे व बुरशीनाशकाची फवारणी करावी.
- कांदा पिकाची काढणी करून कांदा ३ ते ५ दिवस शेतात सुकवावा.
- कांद्याची पात कापतेवेळी २.५ ते ३.० सेंमी. पात ठेवून कापावी.
- पात कापलेला कांदा १५ ते २० दिवस सावलीमध्ये सुकवावा व प्रतवारी करून मध्यम आकाराचा कांदा चाळीमध्ये साठवावा.
- लसूण पिकाची काढणी करून पातीसह गड्या बांधून हवेशीर जागेवर साठवण करावी.
- टोमॅटो पिकाची काढणी ३ ते ४ दिवसांनी करावी.
- उन्हाळी भेंडी पिकाची तोडणी एक दिवस आड करावी.
- गवार पिकाची काढणी करावी.
- वेलवर्गीय भाजीपाल्याची काढणी वेळेवर करावी.
- किड व रोगांचा प्रार्दुभाव आढळून आल्यास तज्ञांच्या सल्यानुसार नियंत्रणाचे उपाय करावेत.
- उन्हाळी टोमॅटो पिकास आधार द्यावा त्यासाठी ताटी पध्दतीचा अवलंब करावा.

### आले

- आले लागवडीसाठी एप्रिल महिन्यात बेणे खरेदी करावे व रासायनिक व जैविक बिजप्रक्रिया करुन बेणे सावलीच्या ठिकाणी साठवावे. मातृकंदापासून बियाण्याचे तुकडे वेगळे.
- रासायनिक बिजप्रक्रियेसाठी क्विनॉलफॉस २५ % प्रवाही २० मिली तसेच कार्बेन्डाझिम ५० % २० ग्रॅम १० लिटर पाण्यात घेवून त्यामध्ये केद १५ ते २० मिनिटे चांगले बुडवावेत. १० लिटरचे द्रावण १०० ते १२० किलो बियाण्यास वापरावे.
- जैविक बिजप्रक्रियेसाठी ॲझोस्पिरिलियम २५ ग्रॅम तसेच पी.एस.बी. २५ ग्रॅम प्रति लिटर पाणी वापरावे.
- बियाणे निवडताना कंदाचे वजन २५ ते ५५ ग्रॅम, लांबी २.५ ते ५ सें.मी. सुप्तावस्था संपलेले २ ते ३ डोळे फुगलेले आसवे. हेक्टरी २५ क्विंटल बेणे लागते.
- लागवडीच्या वेळेपर्यंत या बियाण्याच्या वजनात घट होवून साठवणुकीच्या पध्दतीनुसार त्याचे वजन १५ ते १८ क्विंटल भरते.

### माती परिक्षण

- माती परिक्षणाचे महत्व: सर्वसाधारणपणे पिकास कर्ब, हायड्रोजन, प्रमाणवायु, नत्र, स्फुरद व पालाश या मुख्य अन्नद्रव्यांची, कॅल्शियम, मॅग्नेशियम, गंधक या दुय्यम अन्नद्रव्यांची तर लोह, मंगल, जस्त, तांबे, बोरॉन मॉलिन्डेनम या सुक्ष्म अन्नद्रव्यांची आवश्यकता असते. यापैकी नत्र, स्फुरद, गंधक, लोह व जस्त या सारख्या अन्नद्रव्यांची कमतरता आढळून आलेली आहे. खतांचा असमतोल वापर यापुढे याचपध्दतीने होत राहिला तर भविष्यात जमिनीचे आरोग्य बिघडणे आणि सुपिकता कमी होवून पिकांची उत्पादकता घटण्याबरोबरच निकृष्ट दर्जाची जमीन पुढील पिढीस हस्तांतरीत करण्याची नामुष्की आपणावर येण्याचा मोठा धोका आहे. यासाठी शेतकऱ्याने स्वत:च्या जमिनीचे माती परिक्षण करुन घेणे आणि त्याच्या तपासणी अहवालानुसार येणाऱ्या शिफारशी प्रमाणे खतांचा वापर करणे व जमिनीचे

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ३, मार्च २०२१

व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. त्यामुळे पीक उत्पादनांत वाढ होऊन खताच्या वापरावर होणारा अवाजवी खर्च कमी होणार आहे.

### मातीचा नमुना घेताना घ्यावयाची काळजी

- मातीचा नमुना घेण्यासाठी वापरात येणारी अवजारे उदा. फावडे, कुदळ, घमेले, खुरपी इत्यादी स्वच्छ असावीत.
- मातीचा नमुना पिके काढल्यानंतर परंतू नांगरणी पुर्वी घ्यावा. शक्यतो रब्बी पिकाच्या काढणीनंतर किंवा उन्हाळयात घेतल्यास पृथ:करण करुन परिक्षण अहवाला पेरणीपर्यंत उपलब्ध होतो.
- उभ्या पिकांखालील मातीचा नमुना घ्यावयाचा असेल तर दोन ओळीमधील मातीचा नमुना घ्यावा. परंतु पिकास रसायनिक खत दिले असल्यास तीन महिन्याच्या आंत संबधित जमिनीतून माती नमुना घेवू नये.

### मातीचा नमुना घेण्याची पध्दत

- मातीचा नमुना हा त्या शेतातील प्रातिनिधीक स्वरुपाचा असणे आवश्यक आहे. एक हेक्टर क्षेत्रातील १५ सेंमी खोलीपर्यंतच्या मातीचे वजन अंदाजे २२,४०,००० किलो ग्रॅम असते. यातून काढावा लागणारा ५०० ग्रॅम मातीचा नमुना प्रतीनिधीक होण्यासाठी किती काळजीपुर्वक घ्यावा लागेल याची कल्पना येते. कारण यामधून केवळ काही ग्रॅम माती तपासणीसाठी वापरली जाते व तिच्या तपासणीच्या निष्कर्षावर आधारित खताच्या शिफारशी केल्या जातात. म्हणून मातीचा नमुना काळजीपुर्वक काढावा.
- मातीचा नमुना काढण्यासाठी शेतात गेल्यानंतर प्रथम शेतीची पाहणी करावी व जमिनीच्या प्रकारानुसार वनस्पती/पिकांचा रंग, वाढ भिन्न भिन्न असते, तसेच जमिनीच्या पृष्ठभागवरचा रंग देखील वेगवेगळा असतो. उतारवरील जमीन भुरकट रंगाची असते, सखल भागातील काळी असते म्हणूनच उतार रंग, पोत, खोली, व्यवस्थापन व पीक पध्दतीनुसार विभागणी करावी आणि प्रत्येक विभागातून स्वतंत्र्यरित्या वेगळा प्रातिनिधीक नमुना घ्यावा.

### मातीचे नमुना कोठे व कसा पाठवावा

- मातीचे नमुना घेतल्यानंतर खालील माहिती लिहून ती, मातीचा नमुना असलेल्या पिशवीत टाकावी, मातीचा नमुना लवकरात लवकर जवळच्या शासकीय कृषि महाविद्यालये अथवा प्रमुख, मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग, मफुकृवि, राहुरी यांच्या माती परिक्षण प्रयोगशाळेत सशुल्क तपासण्यात येतील.

### पशुसंवर्धन

- सकाळी दहा ते संध्याकाळी पाच या वेळेत अधिक खादय न देता सकाळी किंवा सायंकाळ नंतर तापमान कमी असतांना खादय दयावे.
- दररोजच्या खादयामध्ये खनिज मिश्रणे किंवा गोठयामध्ये चाटण विटाची व्यवस्था करावी.
- म्हशीच्या अंगावर दिवसातून दोनदा पाण्याचा फवारा किंवा शक्य असल्यास पाण्यात डुंबण्यास सोडावे.
- उन्हाचा वाढता परिणाम रोखण्याकरीता जनावरांच्या गोठयात कुलर/स्प्रिंकलर लावावे किंवा शेडच्या चोहो बाजूंनी पोते लावून त्यावर पाणी शिंपडावे जेणेकरुन गोठयातील हवा थंड राहील.
- स्वच्छ, ताजे व मुबलक पिण्याचे पाणी उपलब्ध करावे.

## अवजारे

### ट्रॅक्टरचलित फुले कुट्टीयंत्र

- फळबागेतील छाटणी नंतर पडणाऱ्या अवशेषांची कुटटी करुन बेडवर दोन्ही बाजूस समांतर टाकण्याकरिता उपयुक्त.
- ३५ अश्वशक्ती आणि त्यापेक्षा जास्त ट्रॅक्टरने सहज चालते.
- अवशेषांची कुटटी करण्याकरिता ट्रॅक्टर (पी.टी.ओ.) यांत्रिक शक्तीचा वापर केला आहे तर कुटटी केलेल्या अवशेषांची बेडवर दोन्ही बाजूस समांतर टाकण्याकरिता हायड्रोलिक शक्तीचा वापर केला आहे.
- एका तासामध्ये ०.४७ हेक्टर क्षेत्रावरील अवशेषांची कुटटी करुन टाकते.
- प्रक्षेत्रीय कार्यक्षमता ७८ %
- पारंपारिक पध्दतीपेक्षा खर्चामध्ये ७२% निवळ बचत.
- या यंत्राच्या वापरामुळे मजुरांची, श्रमाची तसेच वेळेची बचत.

प्रकाशक : डॉ. शरद गडाख
संचालक, विस्तार शिक्षण
प्रमुख संपादक : डॉ. पंडित खर्डे
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
सहसंपादक : डॉ. सचिन सदाफळ
सहाय्यक प्राध्यापक, कृषि विस्तार व संवाद विभाग
डिझाईनर : श्री. राजेंद्र जांभळे
श्री. सिध्दार्थ साळवे
मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २३९०/२०२१